महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन अधिसूचना क्रमांकः वशिअ-१११३/प्र.क्र.७३/११

मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: २४ फेब्रुवारी, २०१४

भारताचे संविधान

क्रमांक- वशिअ-१११३/प्र.क्र.७३/११- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत:-

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (सुधारणा) नियम, २०१४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ मध्ये,

(अ) पोट-नियम (१) च्या शेवटी पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात यावे:

"स्पष्टीकरण - शासकीय कर्मचारी वारंवार त्याला नेमून दिलेले काम त्यासाठी विहित केलेल्या कालमर्यादेत आणि त्याच्याकडून अपेक्षित असलेल्या दर्जानुरूप पूर्ण करीत नसेल तर ती वरील पोट-नियम (१) मधील खंड (दोन) च्या अर्थांतर्गत कर्तव्यपरायणतेमधील उणीव मानली जाईल."

(ब) पोट नियम (३) च्या जागी खालील पोट-नियम समाविष्ट करण्यात यावा:

"(३) (एक) कोणताही शासकीय कर्मचारी त्याच्या कार्यालयीन वरिष्ठाच्या निदेशानुसार कृती करीत असेल ते खेरीजकरुन, त्याच्या कार्यालयीन कर्तव्याचे पालन करीत असताना किंवा त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना त्याच्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार सत्य व अचूक नसलेल्या गोष्टी करणार नाही,

(दोन) कार्यालयीन वरिष्ठाचे निदेश सामान्यत: लिखित स्वरुपात असतील. मौखिक निदेश देण्याचे, शक्य असेल तेथवर, टाळले जाईल. मौखिक निदेश देणे अपरिहार्य असेल तेव्हा कार्यालयीन वरिष्ठ त्यास त्यानंतर तात्काळ लिखित पुष्टी देईल,

(तीन) शासकीय कर्मचारी, त्याला त्याच्या कार्यालयीन वरिष्ठांकडून मौखिक निदेश मिळाल्यानंतर शक्य तेवढ्या लवकर त्यास लेखी पुष्टी मिळविल आणि अशा प्रकरणी निदेशाची लेखी पुष्टी देणे हे कार्यालयीन वरिष्ठाचे कर्तव्य असेल."

सदर शासन अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून अधिसूचनेचा संकेताक २०१४०२२४१४४२५३४१०७ असा आहे. ही अधिसूचना डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2014.02.28 16:26:30 +05'30'

(पां.जो.जाधव)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
६. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
७. * प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
८. * प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
९. * प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०. * सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
११. * सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
१२. * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३. * आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४. सर्व मंत्रालयीन विभाग,
१५. सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख,
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
१७. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),
१८. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
१९. निवडनस्ती

* पत्राने

Government of Maharashtra

General Administration Department

Government Notification No.: VASHIA-1113/C.R.73/11

Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated the 24th February 2014.

Constitution of India

No. VASHIA-1113/C.R.73/11 – In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979, namely:-

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Conduct) (amendment) Rules, 2014.

2. In Rule 3 of the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979,-

(a) in sub-rule (1),at the end, the following Explanation shall be added, namely:- "Explanation .- A Government servant who habitually fails to perform the task assigned to him within the time set for the purpose and with the quality of performance expected of him shall be deemed to be lacking in devotion to duty within the meaning of clause (ii) of sub-rule (1)."

(b) for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely :-

" (3) (i) No Government servant shall, in the performance of his official duties, or in the exercise of powers conferred on him, act otherwise than in his own best judgement to be true and correct except when he is acting under the direction of his official superior,

(ii) The direction of the official superior shall ordinarily be in writing. Oral direction to subordinates shall be avoided, as far as possible. Where the issue of oral direction becomes unavoidable, the official superior shall confirm it in writing immediately thereafter,

(iii) A Government servant who has received oral direction from his official superior shall seek confirmation of the same in writing, as early as possible and in such case, it shall be the duty of the official superior to confirm the direction in writing."

This Notification of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Notification no. for this is 201402241442534107. This notification has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2014.02.28 16:27:04 +05'30'

(P. J. Jadhav)
Deputy Secretary to Government

Copy forwarded to:

1. The Secretary to Governor,
2. The Principal Secretary to the Chief Minister,
3. The Secretary to the Deputy Chief Minister,
4. The Chief Secretary to Government,
5. All Additional Chief Secretaries/ All Principal Secretaries/ All Secretaries to Government,
6. All Private Secretaries/ Personal Assistants to Ministers and Ministers of State,
7. * Registrar, High Court (Original Side), Mumbai,
8. * Registrar, High Court (Appellate), Mumbai,
9. * Registrar, Office of the Lok Ayukta and Upa Lok Ayukta, Mumbai,
10. * Secretary, Maharashtra Legislative Assembly Secretariat, Mumbai,
11. * Secretary, Maharashtra Legislative Council Secretariat, Mumbai,
12. * Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai,
13. * Commissioner, State Election Commission, Mumbai,
14. All Departments of Mantralaya,
15. All Heads of Departments and Heads of Offices under the several Departments of the Mantralaya,
16. Director General, Directorate of Information and Public Relation, Mumbai (5 Copies)
17. Legislature Library, Vidhan Bhavan, Mumbai (10 copies)
18. All desks in the General Administration Department,
19. Select File

* By letter